नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २९९ | Issue - 299 | वार शनिवार दि. २१ मार्च २०२६ | Blow- Saturday Date 21 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर चाकणकरांनी दिला राजीनामा

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी स्वीकारला रुपाली चाकणकर यांचा राजीनामा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आदेशानंतर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी शुक्रवारी रात्री उशिरा उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन आ-पला राजीनामा सोपवला. सुनेत्रा पवार यांनी हा राजीनामा स्वीकारला असून, आता तो औपचारिक मंजुरीसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्यात आला आहे. नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकर यांचे नाव आल्यापासून राजकीय वातावरण तापले होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राजीनाम्याचे आदेश दिल्यानंतर चाकणकर तातडीने उपमुख्यमंत्र्यांच्या 'देवगिरी' या शासकीय निव-ासस्थानी दाखल झाल्या. या भेटीत चाकणकर यांनी प्रकरणाबाबत आ-पली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला; मात्र प्रकरणाचे गांभीर्य आणि वाढता दबाव पाहता, पक्ष आणि सरकारची



प्रतिमा जपण्यासाठी त्यांचा राजीनामा घेण्याचा निर्णय सुनेत्रा पवार यांनी घेतला.

बलात्कार, महिलांचे लैंगिक शोषण, महिलांची फसवणूक अशा गंभीर आरोपांमध्ये भोंदू बाबा आणि स्वयंघोषीत कॅप्टन अशोक खरात याला अटक झाली आहे. अशोक ...

सुनेत्रा पवार यांनी स्वीकारलेला हा राजीनामा आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामार्फत राज्यपालांकडे पाठवला जाईल. राज्यपालांच्या स्वाक्षरीनंतर रुपाली चाकणकर यांचा राजीनामा अधिकृतपणे मंजूर होईल.

बलात्कार, महिलांचे लैंगिक शोषण, महिलांची फसवणूक अशा गंभीर आरोपांमध्ये भोंदू बाबा आणि स्वयंघोषीत कॅप्टन अशोक खरात याला अटक झाली आहे. अशोक खरातसोबत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांचे व्हिडीओ आणि फोटो समोर आले आहेत. अशोक खरातचे पाय धुतानाचे तसेच त्याच्या सोबत कार्यक्रमस्थळी वावरत असतानाचे रुपाली चाकणकर यांचे फोटो आणि व्हिडीओ व्हायरल होत आहेत. हे व्हायरल होत असताना चाकणकरांनी राज्याच्या पोलीस महासंचालकांची भेट घेतली आहे. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रुपाली चाकणकर यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचा आदेश दिला आहे.

पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाची निः पक्षपाती चौकशी करावी अशी म ागणी रुपाली चाकणकर यांनी केली आहे. तर पोलीस कारवाई निःपक्षप-ाती व्हावी यासाठी रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा ताबडतोब राजीनामा द्यावा, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या आदेशामुळे रुपाली चाकणकर यांच्या अडचणीत वाढ झाल्याची चर्चा आहे.

राजकारण्यांना स्वप्न दाखवणाऱ्या तथाकथित ज्योतिषी आणि अंकशास्त्रज्ञ अशोक खरात याला बलात्काराच्या गंभीर आरोपात अटक करण्यात आली आहे. स्वतःकडे दैवी शक्ती असल्याचा दावा करणाऱ्या भोंदू अशोक खरातचे एकूण ५८ धक्कादायक व्हिडीओ समोर आले आहेत. म हिलांना प्रसाद म्हणून गुंगी येणारे औषध खाऊ घालून नंतर त्यांच्यावर अत्याचार केल्याचे खरातचे व्हिडीओ समोर आले आहेत. अशोक खरात स्वतःच्या कार्यालयातच धक्कादायक वर्तन करत होता. हा भयंकर प्रकार सुरू असताना खरातच्या नकळत त्याच्या ऑफिस बॉयने अर्थात नीरज जाधवने सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या म दतीने ५८ व्हिडीओ रेकॉर्ड केले होते. दुष्कृत्य करूनही खरात समाजात 'साधू' म्हणून वावरत असल्याचे पाहून नीरजच्या मनात पैशांची हाव निर्माण झाली. नीरज जाधवने खरा-तला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. नीरज आणि त्याच्या काही साथीदारांनी या वादग्रस्त क्लिप्सच्या बदल्यात खरातकडे पाच कोटी रुपयांची खंडणी मागितली. खरा-तने पैसे देण्यास नकार दिला. यानंतर



नीरज अनपेक्षित अशी कृती केली. भोंदू बाबा खरातने ज्या महिलांचे शो-षण केले त्यातल्याच एका महिलेला फोटो आणि व्हिडीओ पाठवून पैसे मागितले. या महिलेला जवळच्या नातलगांनी पोलिसांत तक्रार देण्याचा सल्ला दिला आणि संपूर्ण प्रकरणाला नवे वळण मिळाले. पोलिसांनी अशोक खरातला बलात्काराच्या आरोपात तर नीरजला खंडणीच्या आरोपात अटक केले. तथाकथित ज्योतिषी आणि अंकशास्त्रज्ञ अश-ोक खरात याची कोट्यवधींची संपत्ती आहे. या संपत्तीची प्राथमिक माहिती पोलिसांच्या हाती आली असून चौकशी सुरू आहे. एका ज्योतिषाकडे एवढी अफाट संपत्ती असल्याचे बघून पोलीसचही चकीत झाले आहेत. नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यात खरातने अफाट माया उभी केली आहे. या पैशांचे स्रोत शोधण्याचे काम पोलीस करत आहेत.

## केंद्र सरकारचा बेटिंग आणि जुगाराच्या ॲप्सवर स्ट्राईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशातील वाढत्या बेकायदेशीर ऑनलाइन जुगार आणि सट्टेबाजीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने आता अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे.



माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने एका मोठ्या कारवाईत ३०० हून अधिक बेकायदेशीर बेटिंग वेबसाइट्स आणि मोबाइल ॲप्सवर बंदी घा-तली आहे. केंद्र सरकारच्या या धडक कारवाईमुळे ऑनलाइन जुगार चालवणाऱ्या जाळ्यांचे कंबरडे मोडले असून, डिजिटल माध्यमांतून होणाऱ्या आर्थिक फसवणुकीला लगाम बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

केंद्र सरकारकडून बेकायदेशीर सट्टेबाजींविरोधातील मोहीम गेल्या काही काळापासून सातत्याने राबवली जात आहे. या मोहिम `अंतर्गत आतापर्यंत ८ हजार ४०० वेबसाइट्सवर कारवाई करण्यात आली आहे. विशेषतः सरकारने लागू केलेल्या नवीन 'ऑनलाइन गेमिंग' नियमानंतर ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे. या नव्या कायद्याचा आधार घेत प्रशासनाने तब्बल ४,९०० वेबसाइट्स आणि ॲप्स पूर्णपणे ब्लॉक केली आहेत. यामध्ये अनेक परदेशी ॲप्सचाही समावेश असून, जे भारतीय चलनामध्ये सट्टा लावण्यासाठी प्रवृत्त करत होते. सरकारने केलेल्या या कारवाईची व्याप्ती मोठी आहे. यामध्ये प्रामुख्याने ऑनलाइन स्पोर्ट्स बेटिंग प्लॅटफॉर्म्सचा समावेश आहे, जे क्रिकेट, फुटबॉल आणि इतर मोठ्या क्रीडा स्पर्धांवर सट्टा लावण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देत हो-ते. यासोबतच ऑनलाइन कॅसिनो, स्लॉट्स, रूलेट आणि लाईव्ह डीलर गेम्स चालवणाऱ्या वेबसाइट्सवरही बंदी घालण्यात आली आहे.

## पश्चिम आशियात तणाव वाढला; पंतप्रधान मोदींनी केली आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी (छप्पनवीर चेवळ) यांनी कतार, फ्रान्स, जॉर्डन, ओमान आणि मलेशिया या देशांच्या नेत्यांशी महत्त्वपूर्ण चर्चा करत परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केली.

### ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ल्यांचा भारताकडून तीव्र निषेध

या संवादांदरम्यान मोदी यांनी ऊर्जा पायाभूत सुविधांवरील हल्ल्यांचा तीव्र निषेध नोंदवला आणि तणाव कमी करण्यासाठी संवाद व राजनैतिक मार्गाचाच अवलंब करण्यावर भर दिला. तसेच, होर्मुझ सामुद्रधुनीत सुरक्षित आणि मुक्त जलवाहतुकीचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

कतारचे अमीर, जॉर्डनचे राजा आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष यांच्याशी बोलताना मोदी यांनी शांतता आणि स्थैर्य पुनर्स्थापित करण्यासाठी सहकार्याची गरज व्यक्त केली.

ओमानचे सुलतान आणि म लेशियाचे पंतप्रधान यांच्याशीही त्यांनी संवाद साधत तणाव कमी करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज अधोरेखित केली.

या चर्चांमधून भारताने पुन्हा एकदा शांतता, सुरक्षितता आणि जागतिक स्थैर्यासाठी आपली ठाम भूमिका स्पष्ट केली आहे.



## भारताचा रुपया विक्रमी नीचांकी पातळीवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय रुपयाने देशाच्या आजवरच्या इतिहासात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत आतापर्यंतची सर्वात म ोठी ऐतिहासिक नीचांकी पातळी गाठली आहे. सुरुवातीच्या व्यवहारात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया पहिल्यांदाच ९३ चा टप्पा ओलांडून ९३.१५ या विक्रमी नीचांकी पातळीवर घसरला आहे. आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या वाढत्या संघर्षामुळे आणि ऊर्जा पायाभूत सुविधा विस्कळीत झाल्यामुळे जागतिक पातळीवर अनिश्चितता निर्माण झाली आहे. पुरवठा साखळी विस्कळीत होण्याच्या भीतीने 'ब्रेंट क्रूड'चे दर प्रति बॅरल १०० डॉलर्सच्या वर गेले आ-हेत. रुपयाची ही घसरण थांबवण्यासाठी आणि त्याला स्थिर करण्यासाठी आता भारतीय रिझर्व्ह बँक बाजारात काही हस्तक्षेप करते का, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. सुरक्षित गुंतवणुकीकडे कल भूराजकीय अनिश्चिततेमुळे जागतिक गुंतवणूकदार 'अमेरिकन डॉलर'सारख्या सुरक्षित पर्यायांकडे वेगाने वळत आ-हेत, ज्यामुळे डॉलर अधिक मजबूत होत आहे आणि रुपयासारख्या उदयोन्मुख बाजारपेठेतील चलनांवर मोठा दबाव येत आहे.

विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारातून मोठ्या प्रम ाणावर आपली गुंतवणूक काढून घेत आहेत. पैसे काढताना ते रुपयाचे रूपांतर डॉलरमध्ये करत असल्यामुळे रुपयाची घसरण आणखी वेगवान झाली आहे.


व्याजदरात कपात करण्याबाबत अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह'ने घेत-लेली सावध भूमिका आणि महागाईच्या धोक्यांमुळे जागतिक बाजारपेठेत डॉलर मजबूत स्थितीत राहिला आहे.

भारत आपल्या गरजेच्या मोठ्या प्रमाणावर तेल आयात करतो. तेलाच्या वाढत्या किमतींमुळे भारताचे 'आयात बिल' प्रचंड वाढते, ज्यामुळे डॉलरची मागणी वाढून रुपयावर आणखी खालच्या दिशेने दबाव येतो. कमकुवत रुपया आणि महागडे कच्चे तेल या दुहेरी संकटामुळे देशात 'आयात महागाई' वाढू शकते. यामुळे इंधन आणि इतर वस्तूंचे दर वाढून व्यवसाय आणि साम ान्य ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसण्याची शक्यता आहे.

## पुढील ४८ तासांमध्ये राज्यातील सात जिल्ह्यांत पावसाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचं संकट कायम असून, आता शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. गेल्या चार ते पाच दिवसांमध्ये राज्यातील अनेक भागात गारपीटीसह पा-वसाने हजेरी लावली आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढील तीन ते चार दिवस गारपीटसह पावसाचे संकट काय आहे. २१ मार्च ते २५ मार्चदरम्यान राज्यातील अनेक भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह



हलक्या ते मध्य स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. उत्तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पावसाचा इशारा देण्यात आला. विदर्भात काही जिल्ह्यात गारपीटसह अवकाळी पावसाची शक्यता आहे. तर काही ठिकाणी तुरळक पाऊस पडल्याने ढगाळ वातावरणाची निर्मिती झाली. पुढील दोन दिवस विदर्भात अवकाळी पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज आहे.

### ३८०२ हेक्टरवरील पिकांची मोठी हानी

# अवकाळीने रब्बी मातीमोल! बुलढाण्यातील २०१ गावांना फटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा/अमरावती: विदर्भातील अमरावती आणि बुलढाणा जिल्ह्यात दोन दिवस अवकाळी पावसासह झालेल्या गारपिटीने शेतकऱ्यांचे रब्बी हंगामातील उत्पन्नाचे स्वप्न मातीम ोल झाले आहे. एकट्या बुलढाणा जिल्ह्यातील २०१ गावांतील ३ हजार ८०२ हेक्टरवरील पिके या पावसाने उद्ध्वस्त झाली आहेत. तसा प्राथमिक अंदाजाचा अहवाल कृषी विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला आहे.

गहू, हभरा, कांदा, कांदा बीज, मका, ज्वारी, भाजीपाला, डाळिंब, केळी, पपई, संत्रा, मोसंबी, आंबा, बाजरी पिके आडवी झाली. तालुकानिहाय विचार करता चिखलीतील १८ गावे, बुलढाणा १४, मोताळा १६, मलकापूर ४२, खामगाव २०, शेगाव दोन, नांदुरा १५, जळगाव-जामोद ४१, संग्राम पूर ११, लोणार १०, देऊळगाव राजा तालुक्यातील १२ गावांमध्ये नुकसानीची तीव्रता अधिक आहे.

दरम्यान, मोताळा तालुक्यातील तळणी येथे वीज कोसळून एका शेतकऱ्याचा तीन एकरातील हरभरा जळून खाक झाला. गुरुवारी रात्री



ही घटना घडली. तळणी येथील श्रीनिवास पद्माकर नाफडे यांनी हरभरा पेरला होता. तीन एकरातील हरभरा सोंगून त्याची गंजी घालण्यात आली होती. रात्रीच्या सुमारास वादळी पा-वसात वीज कोसळल्याने हरभऱ्याची गंजी जळाली. यात सुमारे दोन लाखांवर नुकसान झाले आहे.

अमरावती जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी मेळघाटसह अंजनगाव सुर्जी आणि अचलपूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. अमरावती शहर, नांदगाव खंडेश्वर आणि भातकुली तालुक्यातही मध्यरात्रीपासून पावसाची रिपरिप सुरू होती. मेळघाटातील काटकुंभ, कोयलारी, बामादेही, राजनिकुंड आणि चुरणी परिसरात गुरुवारी म ध्यरात्री १ वाजताच्या सुमारास वाद-ळी पाऊस झाला. या पावसासोबत झालेल्या गारपिटीने उभ्या गव्हाच्या पिकाचा अक्षरशः चिखल केला.

यंदा पीक चांगले येईल, या आशेवर असलेल्या शेतकऱ्यांच्या तोंडचा घास या पावसाने हिरावला आहे. यानिमित्ताने मेळघाटातील आदिवासी शेतकरी आता आर्थिक संकटात सापडला आहे.

प्रशासनाने या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील वनोजा भागात १९ मार्च रोजी दुपारी गारपिटीने तडाखा दिला. तालुक्याचा पांढरा कांदा देशभरात प्रसिद्ध आहे, मात्र काढणीला आलेला हा कांदा आता पावसात भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यातच व्यापाऱ्यांनी पावसाचे निमित्त साधून दरात मोठी कपात केली आहे. दीड हजार रुपये क्विंटल असलेला कांदा आता साडेआठशे रुपयांवर आला आहे.

## संपादकीय....

### फास आवळला!

स्वयंघोषित कॅप्टन अशोक खरात याच्यावर महिला अत्याचाराचे गंभीर आरोप झाल्यानंतर, आता विशेष तपास पथकाने या प्रकरणाचा तपास अधिक तीव्र केला आहे. डिजिटल पुरावे आणि फॉरेन्सिक तपासाच्या आधारे खरातचे संपूर्ण नेटवर्क उद्ध्वस्त करण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. सध्या खरा-तचे फोन कॉल्स, चॅट्स आणि सोशल मीडिया अकाऊंट्सची कसून चौकशी केली जात आहे. पोलिसांच्या हाती लागलेल्या धक्कादायक व्हिडिओंमधील पीडितांना न्याय मिळवून देणे, हा तपासाचा प्राथमिक उद्देश आहे. या व्हिडिओंमध्ये दिसणाऱ्या महिलांची ओळख पटवून त्यांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू झाले आहे. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, खरातच्या तथाकथित 'दरबारात' अनेक बड्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचा वावर होता. धक्कादायक बाब म्हणजे, या अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांच्या नावावर खरातने अनेक ठिकाणी जमिनींची खरेदी-विक्री केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या संशयास्पद आर्थिक व्यवहारांची आणि 'खरात नेटवर्क'ची साखळी पोलीस आता शोधून काढणार आहेत. नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील मोक्याच्या ठिकाणी खरातने मोठी गुंतवणूक केल्याची चर्चा आहे. यामध्ये प्रामुख्याने पाथर्डी-गवळाणे, सिन्नर परिसर, शिर्डी-ओझर पट्टा या परिसरात गुंतवणूक केल्याची चर्चा आहे. अनेकांच्या जमिनी हडपल्याच्या आणि काहींवर अवैध कब्जा केल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या जमिनींची खरेदी नेमकी कोणाच्या पैशातून झाली आणि त्यात कोणत्या बड्या हस्तींचे हितसंबंध गुंतलेले आहेत, हे पोलीस तपासात लवकरच स्पष्ट होईल. जप्त केलेले मोबाईल आणि लॅपटॉपचा डेटा रिकव्हर करण्याचे काम सुरू आहे. खरातला या काळ्या कृत्यात मदत करणाऱ्या त्याच्या साथीदारांची धरपकड होणार आहे. त्याला कोणी मदत करत होतं का याचाही तपास सुरू आहे. बँकांचे व्यवहार आणि काळ्या पैशाचा वापर यांची चौकशी होणार आहे. नोव्हेंबर २०२२ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत शहरातील कॅनडा येथील एका इमारतीमध्ये अशोक खरात याच्या कार्यालयात आपल्यावर अत्याचार झाल्याचे एका पीडित महिलेने फिर्यादीत म्हटले आहे. खरात याने फिर्यादी महिलेचा भावनिक, धार्मिक विश्वास संपादन केला. त्यानंतर तिला मंत्र-तंत्राच्या विधीसाठी कार्यालयात बोलावून तिला गुंगीकारक पदार्थमिश्रित पाणी पाजले. संमोहित अवस्थेत २ पीडिता गेल्यानंतर तिला तिच्या पतीच्या मृत्यूची भीती घालून आणि आयुष्य उद्ध्वस्त करण्याची धमकी देऊन खरातने वारंवार अत्याचार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अशोक खरात हा मर्चेंट नेव्हीमध्ये सेवेत होता. २२ वर्षे सेवा बजावल्यानंतर तो निवृत्त झाला. त्याने १५४ देशांमध्ये प्रवास केल्याची चर्चा आहे. सिन्नर तालुक्यातील मीरगाव येथे स्थापन केलेल्या श्री शिवनिका संस्थान ट्रस्टच्या अध्यक्षपदी खरात, तर सदस्यांमध्ये रूपाली चाकणकर यांचाही समावेश आहे. सेवानिवृत्तीनंतर अंक शास्त्र अन् ज्योतिषी म्हणून व्यवसाय सुरू केला. राज्यातील मोठे मंत्री खरातकडे 'भविष्य' जाणून घेण्यासाठी येऊ लागल्याने सर्वत्र तो चर्चेत आला. खासगी विमानाने प्रवास करण्यापासून त्याची 'लॅव्हिश लाइफस्टाइल' अनेकांना चक्रावून टाकणारी होती.

# तमाम वागदरीकरांच्या अपार भक्तीचा आणि परमोच्च आनंदाचा उत्सव : श्री. परमेश्वर यात्रा महोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गाव छोटं असो की मोठं प्रत्येक गावाची एक सुसंस्कृती असते, चांगल्या परंपरा आणि चालीरीती असतात. काळाचे चक्र कितीही गतिमान फिरू दे, पण खेडेगावातील संस्कार, संस्कृती आणि चांगल्या परंपरा चालीरीती हे आपल्या गावाचं गावपण तसेच टिकून ठेवून घट्ट उभे असतात. याच संस्कार, संस्कृती, परंपरेतील कोणत्याही अबाल वृद्ध गावकऱ्यांच्या अपार उत्साहाचा,परमोच्च आनंदाचा उत्सव म्हणजे त्या गावची यात्रा असते.

खरंतर दरवर्षी जानेवारी ते मे या महिन्याच्या दरम्यान आपल्या अक्कलकोट तालुक्यामधील अनेक खेडे गावांमध्ये वेगवेगळ्या ग्रामदैवतांची यात्रा भरत असते. त्यातीलच आत्ता सध्य स्थितीमध्ये गुढीपाडव्यापासून पार पडत असलेली यात्रा म्हणजे आपल्या अक्कलकोट तालुक्यातील वागदरी गावचे ग्रामदैवत श्री. परमेश्वर यात्रा महोत्सव. चला तर मग आज आपण वागदरी गावचे ग्रामदैवत श्री. परमेश्वराच्या यात्रेबद्दल सविस्तर जाणून घेऊयात.

ग्रामदैवत श्री. परमेश्वराची यात्रा म्हणजे अबाल वृद्ध वागदरीकरांच्या काळजाचा विषय. आषाढी एकादशीला अवघा महाराष्ट्र पंढरीच्या वाळवंटामध्ये ज्याप्रमाणे पांडुरंगाच्या चरणी लीन होण्यासाठी एकवटतो अगदी त्याच उत्कटतेने भक्तीभावाने आणि अधीरतेने आपण सारे वागदरीकर मंडळी ग्रामदैवत श्री.परमेश्वराच्या चरणी लीन होण्यासाठी आतुर झालेले असतो. आपण सारे उत्सव प्रिय माणसं,प्रत्येक सणवार, उत्सव आपण अपार उत्साहतच साजरे करतो. पण आपणा वागदरीकरांना ग्रामदैवत श्री. परमेश्वराची यात्रा आणि पर्व महोत्सव हे अधिक आनंद आणि उत्साह देऊन जातात.ग्रामदैवत श्री. परमेश्वर यात्रेचा मुख्य कालावधी हा चैत्र शुद्ध गुढीपाडवा या हिंदू नववर्षापासून पुढचे सलग सहा दिवस असतो. मात्र या यात्रेची खऱ्या अर्थाने चाहूल लागते ती महाशिवरात्रीनंतरच्या पहिल्या सोमवारपासूनच.या दिवशी यात्रा पंच कमिटीचे पदाधिकारी, सदस्य हे श्री.परमेश्वर मंदिरासमोरील धर्म ध्वजाचे अनावरण करून गावातील सर्व जाती धर्माच्या श्री.परमेश्वर भाविक भक्तांकडून यात्रा महोत्सवाच्या वर्गणीसाठी सुरुवात करतात.या दिवसापासूनच गावातील माता भगिनींचा घरातील स्वच्छता करणे सर्व धुणी भांडी करण्यास सुरुवात करतात. कामानिमित्त गावापासून दूर असलेली मंडळी त्यांचे गावातील घर हे कायमच बंद असतात अशी मंडळी देखील यात्रेपूर्वी गावाकडे येऊन आपल्या घरादाराची साफसफाई करतात आणि यात्रेपूर्वीच संपूर्ण गावचे वातावरण हे यात्रेच्या चाहूलने गजबजु लागते. मग जसा पाडव्याचा शुभ दिन उगवतो, त्या दिवसाच्या भल्या पहाटेपासूनच ग्रामदैवताच्या प्रत्यक्ष यात्रेस सुरुवात होते. गुढीपाडव्याच्या भल्या पहाटेपासूनच गावातील श्री. परमेश्वर भाविक भक्त हे आपले घर ते श्री. परमेश्वर मंदिरांपर्यंत दंड नमस्कार घालत असतात. काही मंडळी गुढीपाडवा आणि यात्रेचा मुख्य दिवस असे दोन दिवस तर काही मंडळीही पाडव्यापासून सलग पाच दिवस दंड नमस्कार घालत असतात.यात्रेचे मानकरी मंडळी ही सलग पाच दिवस दररोज गावातील लहान मोठ्या मंदिरामध्ये जाऊन जलाभिषेक घालून पूजाअर्चा करत असतात. त्याच दिवशी उचई (लहान रथ) मानकरी मंडळी कडून उचई वर कळस चढवला जातो. तसेच गुढीपाडव्या दिवशी



सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास श्री. परमेश्वराच्या मुख्य रथाचे जागा सोडण्याचा कार्यक्रम साजरा केला जातो. सायंकाळी सात ते नऊ या कालावधीमध्ये गावातील माता-भगिनी या आरती घेऊन आणि मुले,पुरुष मंडळी हे दिवटी घेऊन ग्रामदैवत परमेश्वराला ओवाळण्यासाठी मंदिरात येत असतात. रात्री नऊच्या दरम्यान माता-पार्वतीच्या रूपातील उचईची मिरवणूक गावातील मार्गावरून होते. त्यासोबतच दिवटीचे मानकरी, नगारी बैलाचे मानकरी, धनगरी ढोल पथक,शंभू महादेवाचे कावड यासह हलगी सनई च्या निनादामध्ये रात्री अकरा पर्यंत मिरवणूक चालते .सलग पाच दिवस श्री.परमेश्वराचे महा अभिषेक चालतो. वेगवेगळे धार्मिक विधी चालतात. यादरम्यान वागदरीकर सुतार बांधवांकडून रथावर पाच थरांचे लाकडी माळे बनवण्याचे काम सुरू असते. रथोस्तवाच्या आदल्या दिवशी रथ संपूर्ण सजवण्यात येतो. रथोत्सवाच्या आदल्या रात्री जवळजवळ एक वाजेपर्यंत मंदिरासमोर थोरली मधलेसी साजरी केली जाते. यावेळी श्री.परमेश्वर मंदिरासमोरील बाजूस श्री.परमेश्वर भाविक भक्तांकडून गुळ साखर,पेढा वाटपाचा कार्यक्रम पार पडतो. यादरम्यान भाविक भक्तांची खूप मोठी गर्दी असते. यात्रेचा मुख्य दिवस म्हणजे रथोत्सवाचा या दिवशी दिवसभर गावातील प्रत्येक घरातील भाविक भक्तांकडून ग्रामदैवत श्री.परमेश्वरासह इतर देवतांना नैवेद्य दाखवले जाते. नवस सायास बोललेली मंडळी वाजत गाजत मिरवणूक काढत आपले नवस पूर्ण करतात. संपूर्ण यात्रा महोत्सवातील अत्यंत उत्कंठा वर्धक क्षण म्हणजे मुख्य रथ ओढण्याचा. हा कार्यक्रम सायंकाळी सव्वा सहाच्या दरम्यान चालू होतो. हा रथोत्सव पाहण्यासाठी तमाम वागदरीकरांसह, वागदरी करांच्या पै पाहुण्यांसह संपूर्ण वागदरी पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने एक वाटतात. अशाप्रकारे भाविक भक्तांच्या अफाट गर्दीमध्ये, अतिशय भक्तीमय वातावरणात आणि अभूतपूर्व उत्साहामध्ये दरवर्षी श्री.परमेश्वर रथोत्सव पार पडतो. रथोत्सवाच्या रात्री आपले गोंधळी समाज बांधव हे कुस्ती आखाड्यामध्ये नाटक सादर करतात व श्री. बसवेश्वर मंदिराजवळ आपल्या वागदरी नाट्य कंपनीकडून खादी,खाकी, कावी या सुंदर सामाजिक नाटकाचे प्रयोग सादर होणार आहेत. या नाटकाचा गावातील सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच यात्रेच्या दुसऱ्या दिवशी श्री.परमेश्वर कुस्ती आखाडा वागदरी या ठिकाणी राज्य परराज्यातील अनेक नामवंत मल्लांच्या कुस्त्यांचा फड रंगणार आहे. हा कुस्ती खेळ पाहण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित रहावे. या दोन सत्रामध्ये पार पडणाऱ्या कुस्त्यांचे उद्घाटन हे माजी आमदार श्री सिद्धाराम म्हेत्रे साहेब व सहकारी (सकाळ सत्र), दुपार सत्र कुस्तीचे उद्घाटन हे आपल्या अक्कलकोट तालुक्याचे विद्यमान आमदार श्री.सचिन दादा कल्याण शेट्टी साहेब व सहकार्यांकडून होणार आहे. मुख्य बाजारपेठेमध्ये खेळण्यांच्या बाजारासह मिठाईचे दुकानांची रेलचेल असते. या संपूर्ण यात्रेच्या दरम्यान गावामध्ये मोठी आर्थिक उलाढाल होत असते. कुस्त्यांच्या सांगता समारंभा नंतर सायंकाळी सातच्या दरम्यान शोभेचे दारू काम कार्यक्रम संपन्न होणार आहे. त्यानंतर खऱ्या अर्थाने श्री. परमेश्वर यात्रेची सांगता होणार आहे. रथोत्सव आणि कुस्तीच्या दिवशी असे मिळून सलग दोन दिवस श्री.परमेश्वर देवस्थान ट्रस्ट यांच्याकडून गावातील व परगावहून आलेल्या श्री.परमेश्वर सदभक्तांसाठी महाप्रसादाची सोय करण्यात आले आहे. सर्व सदभक्तांनी या यात्रा महोत्सवात सहभागी होऊन या यात्रा महोत्सवाचा आनंद घ्यावा. हा संपूर्ण यात्रा महोत्सव पार पाडण्यासाठी श्री. परमेश्वर देवस्थान पंचकमिटी, पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी, गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्यासह, गावातील तमाम लहानथोर समाज बांधवांचे सहकार्य लाभते. हे सारे जण आपापले काम प्रामाणिकपणे पार पाडत असतात.



**शब्दांकन.**
**श्री. मारुती देविदास शिंदे..**
**वागदरी ता अक्कलकोट जिल्हा सोलापूर**

# वने ही पृथ्वीचे हिरवे फुफ्फुस आहेत!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


वने ही पृथ्वीचे हिरवे फुफ्फुस आहेत हा विचार केवळ एक आकर्षक घोषवाक्य नसून, तो पर्यावरणशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत वैज्ञानिक, तर्कसंगत आणि वास्तववादी आहे. डॉ. भारत कऱ्हाड यांच्या मते, वनांचे महत्त्व समजून घेतल्याशिवाय मानवजातीचे भविष्य सुरक्षित राहू शकत नाही. हा विचार मानव आणि निसर्ग यांच्यातील परस्परावलंबित्व स्पष्ट करतो.

मानवाच्या शरीरात फुफ्फुसांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. फुफ्फुसे ऑक्सिजन शरीरात घेऊन कार्बन डायऑक्साइड बाहेर टाकतात, ज्यामुळे जीवनाची प्रक्रिया सुरळीत चालते. याचप्रमाणे वने पृथ्वीच्या पातळीवर हीच भूमिका बजावतात. वने वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि ऑक्सिजन निर्माण करतात. ही प्रक्रिया फोटोसिंथेसिस द्वारे घडते. त्यामुळे पृथ्वीवरील हवा शुद्ध राहते आणि सर्व जीवसृष्टीला आवश्यक असलेला श्वास उपलब्ध होतो.

डॉ. कऱ्हाड यांच्या मतानुसार, वने ही केवळ ऑक्सिजन निर्माण करणारी साधने नसून ती एक व्यापक परिसंस्था आहेत. जंगलांमध्ये असंख्य प्राणी, पक्षी, वनस्पती आणि सूक्ष्मजीव एकमेकांवर अवलंबून राहून जीवन जगतात. त्यामुळे वने ही जैवविविधतेचे केंद्र आहेत. जगातील सुमारे ८० टक्के स्थलजीवांचे निवासस्थान जंगलांमध्ये आहे, ही बाब वनांचे महत्त्व अधोरेखित करते.

वनांचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे हवामान संतुलित ठेवणे. वने पृथ्वीचे तापमान नियंत्रित करतात, पावसाचे चक्र नियमित ठेवतात आणि जलस्रोतांचे संरक्षण करतात. जर जंगलांची संख्या कमी झाली, तर हवामान बदल तीव्र होतो. उष्णतेच्या लाटा, दुष्काळ, पूर आणि जंगलातील आगी यांसारख्या समस्या वाढतात. त्यामुळे वनसंवर्धन हे हवामान बदलाच्या विरोधातील लढ्यातील एक महत्त्वाचे शस्त्र आहे.

तथापि, आजच्या काळात जंगलांवर मोठे संकट आले आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण, खाणकाम आणि शेतीसाठी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जंगलतोड केली जात आहे. दरवर्षी लाखो हेक्टर जंगल नष्ट होत आहेत. यामुळे केवळ पर्यावरणीय संतुलन बिघडत नाही, तर अनेक प्राणी आणि वनस्पती प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. हा प्रवाह असाच सुरू राहिला, तर भविष्यात पृथ्वीवर जीवन टिकवणे कठीण होईल.



डॉ. कऱ्हाड यांचे मत आहे की, विकास आणि पर्यावरण यामध्ये संतुलन राखणे अत्यावश्यक आहे. केवळ आर्थिक प्रगतीसाठी निसर्गाचा विनाश करणे हा दीर्घकालीन दृष्टीने घातक निर्णय ठरतो. त्यामुळे शाश्वत विकास ही संकल्पना स्वीकारणे गरजेचे आहे.

या संदर्भात युनायटेड नेशन्स सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनीही वनसंवर्धनासाठी विविध उपक्रम सुरू केले आहेत. २१ मार्च हा दिवस जागतिक वने दिन म्हणून साजरा करून जागतिक स्तरावर जनजागृती केली जाते. भारता सारख्या देशांनी वृक्षारोपण मोहिमा राबवून वनक्षेत्र वाढवण्याचा प्रयत्न केला आहे.

परंतु केवळ सरकारी प्रयत्न पुरेसे नाहीत. प्रत्येक नागरिकाने या चळवळीत सहभागी होणे आवश्यक आहे. वृक्षारोपण करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, पाण्याची बचत करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. विशेषतः तरुण पिढीने या विषयाकडे गांभीर्याने पाहून सक्रिय भूमिका घेतली पाहिजे.

शेवटी, वने ही पृथ्वीचे हिरवे फुफ्फुस आहेत हा विचार केवळ एक उपमा नसून, तो मानवजातीच्या अस्तित्वाचा आधार आहे. जर आपण वने वाचवली, तरच आपण आपले भविष्य वाचवू शकतो. त्यामुळे वनसंवर्धन ही केवळ एक पर्यावरणीय गरज नसून ती मानवाची नैतिक जबाबदारी आहे.

**– डॉ. भारत कऱ्हाड**

# मारुती बनसोडे यांची महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कारासाठी निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा मार्फत दिला जाणारा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कारासाठी नळदुर्ग ता. तुळजापूर येथील परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव तथा सामाजिक कार्यकर्ते मारुती बनसोडे यांची निवड करण्यात आली आहे.

मारुती बनसोडे यानी सन १९९ -९१ मध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्म शताब्दी वर्षात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी १०१ व्याख्यानाचा संकल्प केला व तो संकल्प त्यानी पूर्ण ही केला.त्यानंतर चिवरीच्या पशुहत्या विरोधी आंदोलनातील ते सक्रिय सहभागी झाले होते. दि. ०४ ऑगस्ट १९९६ ला तुळजापूर येथे त्यानी पुढाकार घेवून मराठवाडा पातळीवरील पोतराज प्रथा निर्मूलन निर्धार परिषद घेतली. अंधश्रध्दा निर्मल समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष कै.डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्यासोबत त्यानी दहा वर्षे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम केले आहे. त्यानंतर परिवर्तन सामाजिक संस्थेची स्थापना केली या संस्थेच्या माध्यमातूनही धाराशिव जिल्ह्यात परंडा ,कळंब, तुळजापूर, लोहारा इत्यादी तालुक्यात त्यांनी विविध विषयावर काम केले आहे. नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने धाराशिव जिल्ह्याचे जिल्हा संघटक म्हणून ते गेली तीन-चार वर्षे काम करीत आहेत. सन २०२३ - २४ या कालावधीत व्यसनमुक्तीसाठी धाराशिव जिल्हयात अतिशय चांगल्या पद्धतीने काम केल्यामुळे राज्य शासनाने त्यांच्या कामाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार - २०२३ - २४ साठी निवड करण्यात आली आहे.सदर निवडी संर्भात दि.१८ मार्च २०२६ रोजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने एक जीआर काढलेला असून त्यामध्ये त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.धाराशिव जिल्ह्यातून एकमेव त्यांची या पुरस्कारासाठी निवडीबद्दल परिसरातून अनेकांनी त्यांना शुभेच्छा देवून आभिनंदन केले आहे.


## मुखवटेधारी सोंगांची अनोखी परंपरा; सर्व धर्मीयांच्या सहभागातून गावात ऐक्याचा संदेश

# पडघ्यात शंभर वर्षांची परंपरा जपणारी 'बोहाडा' यात्रा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :भिवंडी तालुक्यातील पडघे येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपरिक 'बोहाडा' यात्रा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडली. गुढीपाडव्याच्या निमित्ताने भरविण्यात येणारी ही यात्रा पंचक्रोशीत प्रसिद्ध असून यावर्षीही मोठ्या संख्येने नागरिकांनी यात्रेत सहभाग नोंदवला. शंभर वर्षांहून अधिक जुनी परंपरा लाभलेल्या या यात्रेत पडघेकरांनी आपली संस्कृती जपण्याचा अनोखा वारसा कायम ठेवला आहे. बोहाडा यात्रेच्या दिवशी कान्होबा मंदिरापासून ते गावाच्या वेशीपर्यंत पारंपरिक वेशभूषा परिधान करून वाद्यांच्या तालावर देवी-देवतांची सोंगं नाचवली जातात. विशेष म्हणजे विविध देवतांचे मुखवटे घालून सोंगं सादर करण्याची ही परंपरा आजही तेवढ्याच उत्साहाने जोपासली जात आहे.





या सोहळ्यात देवी-देवतांच्या सोंगांचे सादरीकरण पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. मंदिरापासून गावाच्या वेशीपर्यंत नाचत जाणारी ही सोंगं पुन्हा मंदिरात परत येतात, हा सोहळा पाहण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या उत्साहाने उपस्थित राहतात. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी पहाटे सर्व सोंगांचा कार्यक्रम पार पडताच ग्रामदैवत आई गावदेवीचे पात्र साजरे करून गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. आई गावदेवीचे पात्र रितेश मेस्त्री यांनी साकारले होते. या उत्सवाची परंपरा दिवंगत कै. तुळशीराम गायकवाड यांनी सुरू ठेवली असून सध्या त्यांचे सुपुत्र जगदीश गायकवाड हे या उत्सवाची धुरा सांभाळत आहेत. गावातील नागरिक तसेच युवकांचा उत्स्फूर्त सहभाग या उत्सवाला लाभत असल्याने परंपरा अधिक बळकट होत आहे. यात्रेदरम्यान मुख्य रस्त्याच्या दुतर्फा विविध मनोरंजनाची साधने, पाळणे, लहान मुलांसाठी खेळणी, तसेच विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते. पडघा ग्रामपंचायतीच्या वतीने पिण्याच्या पाण्याची व वीजेची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. गुढीपाडवा आणि बोहाडा यात्रेच्या निमित्ताने भिवंडी तालुक्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने पडघ्यात दाखल झाले होते. विशेष म्हणजे या उत्सवात सर्व जाती-धर्मीय नागरिक एकत्र येऊन सहभाग घेतात, त्यामुळे गावातील सामाजिक ऐक्य अधिक दृढ होत असल्याची भावना स्थानिक ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली. दरम्यान, यात्रेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पडघा पोलीस ठाण्याच्या वतीने ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अशा प्रकारे परंपरा, संस्कृती आणि सामाजिक ऐक्य यांचे दर्शन घडवणारी पडघ्याची 'बोहाडा' यात्रा यंदाही मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# चैत्री यात्रेसाठी व्यापक सोई-सुविधा; वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर विशेष उपाययोजना

## मंदिर समितीची सभा संपन्न; मा. उपमुख्यमंत्री अजित (दादा) पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : चैत्र शुद्ध एकादशी अर्थात कामदा एकादशी निमित्त दरवर्षी भरत असलेली चैत्री यात्रा यावर्षी रविवार, दि.२९ मार्च रोजी आयोजित करण्यात आली असून यात्रेचा कालावधी दि.२३ मार्च ते दि.०२ एप्रिल असा राहणार आहे. यात्रेस येणाऱ्या भाविकांसाठी व्यापक सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विशेष उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.





दि.२० मार्च रोजी दुपारी १२.१५ वाजता श्री विठ्ठल-रूक्मिणी भक्तनिवास येथे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली मंदिर समितीची सभा संपन्न झाली. सभेस शकुंतलाताई नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञा-नेश्वर देशमुख (जळगांवकर), ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, प्रणिताताई भालके, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक संदेश भोसले, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, सर्व खाते प्रमुख, पुरातत्व विभागाचे डॉ. विलास वाहणे, विद्युत विभागाचे श्रीनिवास गुजरे, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे तसेच जतन-संवर्धन कामाचे ठेकेदार उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. अजित (दादा) पवार यांच्या नुकत्याच झालेल्या अपघाती निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यात आला. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, ही श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या चरणी प्रार्थना व्यक्त करत मंदिर समितीच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असल्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

सभेमध्ये चैत्री यात्रेच्या नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यात्रेदरम्यान मंदिर समितीशी संबंधित सर्व प्रथा-परंपरांचे काटेकोर पालन करण्यात येणार आहे. वाढते तापमान लक्षात घेऊन दर्शनरांगेतील भाविकांसाठी थंड व शुद्ध पिण्याचे पाणी, लिंबू सरबत, पंखे व कुलर व्यवस्था, आरोग्य सेवा स्टॉल तसेच अन्य आवश्यक सुविधा उप-लब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. माघ यात्रेतील गर्दीचा अनुभव लक्षात घेऊन यंदा चैत्री यात्रेसाठी दहा वॉटरप्रूफ पत्रा शेड उभारण्यात येणार आहेत. भाविकांच्या हस्ते होणाऱ्या पूजा व टोकन दर्शन सुविधा यात्रेदरम्यान बंद ठेवण्यात येणार असून व्हीआयपी दर्शनावर निर्बंध लागू करण्यात येणार आहेत. तसेच भाविकांच्या सोयीसाठी दर्शनाची वेळ वाढवून सकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

यावेळी श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिरांच्या जतन, संवर्धन व जीर्णोद्धार कामाचा आढावा घेण्यात आला. मंदिर संवर्धन व श्रींच्या मूर्ती संवर्धनाबाबत सल्लागार परिषदेचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले. दि.१७ मे ते दि.१५ जून या कालावधीत येणाऱ्या अधिकमासातील संभाव्य गर्दी लक्षात घेऊन भाविकांसाठी अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच जून २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीतील जमा-खर्चास मंजुरी देण्यात आली. श्री पांडुरंगाचा पालखी सो-हळा श्रीक्षेत्र अरण येथे नेण्याबाबत सल्लागार परिषदेचा सल्ला घेण्याचा निर्णय घेण्यात आला. पंढरपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्ष प्रणिताताई भालके या मंदिर समितीच्या पदसिद्ध सदस्य असून त्यांची ही पहिलीच बैठक असल्याने सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. शिवाजीराव मोरे यांना राजा शिवछत्रपती समाजभूषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव सभेत पारित करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

---

## देशाची सत्ता हस्तगत करण्यासाठी संघटन मजबूत असावे



### डॉ. युवराज मेश्राम यांचे प्रतिपादन : समता सैनिक दलाचा विदर्भ मेळावा साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवेगावबांध : हा देश विकोपाला जात आहे. सामान्य माणसाचे जगणे कठीण झाले असून लोकशाही टिकवली जात नाही. प्रजासत्ताक राष्ट्र असून देशाचा नागरिक सुखी समाधानी नाही. रोजचे जगणे म्हणजे युध्द झाले आहे. म्हणून देशाची सत्ता हस्तगत करण्यासाठी संघटन मजबूत असावे. असे प्रतिपादन डॉ युवराज मेश्राम यांनी केले. ते समता सैनिक दलाच्या विदर्भस्तरीय मेळाव्याचे मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर दादासाहेब कोचे राष्ट्रीय अध्यक्ष समता सैनिक दल यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटक नागदीपंकर स्थवीर, मुख्य मार्गदर्शक म्हणून ब्रम्हपुरी येथील व्याखाते प्रा.डॉ. युवराज मेश्राम, आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक मुन्नाभाई नंदागवळी, प्रमुख उपस्थित संघप्रिय नाग राष्ट्रीय ट्रेनिंग चीप, गजेंद्र गजभिये स्टाफ ऑफिसर , मिथुन मेश्राम माजी जिल्हा प्रमुख, अजय अंबादे जी ओ सी, डेव्हिड शेंडे जी ओ. सी. चंद्रपूर, सुरेखा टेंभुर्णे असी. जी. ओ. सी. मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी भगवान बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रम हा (दि. १९ मार्च) नवेगावबांध येथील सानगडी रस्त्यावर दुपारी ०३.१० वाजता संपन्न झाला.

१९ मार्च १९२७ ला स्थापना करण्यात आली. याचा ९९ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आले. यावेळी मंचावरील मुन्नाभाई नंदागवळी यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून बौद्ध बांधवांना मार्गदर्शन केले. याठिकाणी जवळपास पाच जिल्ह्यातील समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. संपूर्ण नवेगावबांध हे गजबजून गेले होते.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक आयोजक मिथुन मेश्राम यांनी मांडले. संचालन हरिश्चंद्र लाडे यांनी केले तर आभार मंजुषा वासनिक यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोंदिया, भंडारा चंद्रपूर गडचिरोली नागपूर या जिल्ह्यातील सैनिकांनी सहकार्य केले.

---

## संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथे चिमुकलेवर झालेल्या हल्ल्याचे पंढरपुरात पडसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : संगम नेर तालुक्यातील वडगाव पाणी येथील चिमुटलीवर झालेल्या सिड हल्लूयाचे पडसाद पंढरपूर येथे उमटले असून भारतीय नरहरी सेना सराफ सुवर्णकार संरक्षण समिती व सर्व राखीव सोनार समाज यांच्या वतीने शहर पोलीस निरीक्षक उपायुक्त पोलीस अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात संगमनेर तालुक्यातील वडगाव पाणी येथे राहणाऱ्या संजय डहाळे यांच्या १३ वर्षाच्या इयत्ता सहावी शिकणाऱ्या शिंपल्यावर अज्ञात माती फिरून सिड हल्ला करून त्या मुलीला जबर जखमी केली माणुसकीला काळंबा असणार आहे या नळदमाला समाजकंटकाला त्वरित अटक करून त्याला कठोरात कठोर शिक्षा करण्याची मागणी करून भारतीय नरहरी सेना सराफ सुवर्णकार संरक्षण समिती व सर्व शासकीय सोनार समाज यांच्या वतीने महाराष्ट्रावर भर देऊन आंदोलन छेडण्यात असा इशारा निवेदनात शक्ती देण्यात आला.



यावेळी सोनार समाज संस्थेचे अध्यक्ष अरुण शेठ मदत कर भारतीय नरहरी सेना संस्थापक अध्यक्ष धर्मभूषण काटा साहेब बोराडे. समाज संस्था उपाध्यक्ष संजय शेठ ढाळे, सराफ सुवर्णकार संरक्षण समिती सोमनाथ शेठ आवताडे, संदेश जी सोनार, मा. समाज अध्यक्ष अनिल शेठ ढाळे, संस्था कधी देणार राजेशजी चौधरी समाज उपाध्यक्ष लंकेजी बोराडे प्रसाद भैया डाळे राजेंद्र लोळगे ज्ञानेश्वर चौधरी मच्छिंद्र वाळवेकर आधी समाज बांधव उपस्थित होते.

---



## मोहा येथे हजरत सय्यद अलवी रहेमुतल्लाह अलैह दर्गा येथे इफ्तार पार्टीचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहा/प्रतिनिधी : प्रविण कसबे कळंब तालुक्यातील मोहा येथील सर्व धर्मीयांचे श्रध्दास्थान असणारे देवस्थान हजर सय्यद अलवी रहेमुतल्लाह अलैह दर्गा येथे पवित्र रमजान ईद महिन्याच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही म ोहा गावचे लोकप्रिय मा.जिल्हा परिषद सदस्य संदीप मडके यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन अत्यंत उत्साही आणि भावनिक वातावरणात संपन्न झाले.

या इफ्तार पार्टी सोहळ्यादरम्यान गावातील समाजबांधव एकत्रितपणे इफ्तार पार्टीचा आनंद घेत असल्याने हिंदू -मुस्लीम ऐक्याचे दर्शन घडले.व या उपक्रमातुन गावा-तील सर्व समाजबांधवामध्ये खरी एकता व बंधुत्वाची ओळख आहे.

जवळपास तब्बल एकोणीस (१९) वर्षे अखंडपणे सुरू असलेली ही परंपरा आजही तितक्याच आपुलकीने जपली जात आहे.धर्म वेगळे असले तरी मन आणि विचार एक आहेत.हा संदेश या उपक्रमातून अधिक दृढ होत आहे.

हि गावांसाठी अभिमाना-ची आणि आदर्श ठरणारी बाब आहे.

यावेळी या कार्यक्रमाला विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीचे संचालक शौकत शेख, इरशाद सय्यद,जावेद सय्यद, संचालक हनुमंत मडके, आत्माराम लकडे व गा-वातील सर्व जातीधर्मातील समाजबांधवांनी मोठा सहभाग नोंदवला होता.

---

### हिंदु-मुस्लिम सलोख्यातून सर्वधर्म समभावाची शिकवण

## 'ईजान' ने दिली वर्गमित्रांना 'शिरखुर्म्याची' अनोखी भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शालेय परिपाठात ईद-उल-फित्र म्हणजेच रमजान ईदची माहिती देताना मुस्लिम धर्माचे संस्थापक हजरत महम्मद पैगंबर, धर्मग्रंथ कुराण शरीफ, रोजे, इफ्तार पार्टी यांसह ईदच्या दिवशी शिरखुर्म्याची मेजवानीचा विषय निघाला आणि....मुलांनी शिरखुर्म्याची चव कशी असते, तो खाण्याची इच्छा व्यक्त केली. लगेच वर्गातील ईजान शेख, अझर सैय्यद, साकी मनियार, मारिया शेख या विद्यार्थ्यांनी पालकांच्या मदतीने ईद ची भेट म्हणून आपल्या सर्व वर्गमित्रांना शिरखुर्म्याची अनोखी मेजवानी दिली.






निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर शाळेत या आगळ्या-वेगळ्या उपक्रमातून सामाजिक एकोपा, जातीभेद, सर्वधर्म समभाव, मूल्यसंवर्धनाची शिकवण देत राष्ट्रिय एकात्मतेचा संदेश दिला. याप्रसंगी न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळाचे सचिव रतन वडघुले, विश्वस्त किरण कापसे, मधुकर राऊत, विश्वास कराड, मुख्याध्यापिका सुजाता तनप-ुरे यांनी मुलांना ईद च्या शुभेच्छा दिल्या.

जातीधर्माच्या भिंतींना छेद देत चिमुकल्यांनी आपल्या वर्गमित्रांना शिरखुर्म्याची मेजवानी दिली. शिरखुर्म्याचा गोडवा चाखत इतर मुलांनी आपल्या मित्रांना स्वतः तयार केलेले शुभेच्छाकार्ड व भेट वस्तू देऊन एकमेकांची गळाभेट घेत 'ईद मुबारक' म्हणत शुभेच्छा दिल्या.

हिंदु-मुस्लिम एकतेचे दर्शन घडवित समाजात विविध धर्मांमध्ये असलेले तेढ मिटवण्यासाठी चिमुकल्यांनी राबविलेला उपक्रम खारीचा वाटा असला तरी समाजाच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे. वेगवेगळ्या जाती धर्माचे, भाषेचे विचारसरणीचे लोक जरी भारतात रहात असतील तरी देशा-ची ओळख जर कोणती असेल तर ती म्हणजे 'भारताची एकात्मता'. हीच एकात्मता जोपासण्यासाठी राबविलेल्या चिमुकल्यांच्या या उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

---

## शिवस्वराज्य युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संघटनेचे वतीने शालेय वस्तूंचे वाटप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शिवस्वराज्य युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पोपट आत्माराम पताडे यांची कन्या कुमारी गौरी पोपट पताडे हिच्या वाढदिवसानिमित्त नांदुर नाका नाशिक येथील मनपा शाळा क्रमांक -३ मध्ये शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले.पताडे यांनी हा उपक्रम राबवुन व वाढदिवसला अवाढव्य खर्च न करता एखाद्या शाळा, अनाथाश्रम, वृध्दाश्रम, गरजुना मदत करुन वाढदिवस साजरा करावा असा मोलाचा संदेश दिला आहे.

शाळेचे मुख्याध्यापक मोरे रेखा आवारे व शिक्षक उपस्थित होते.

# मंद्रूप पोलिसांचा टाकळी येथील जुगार अड्ड्यावर सर्जिकल स्ट्राईक

## सलग छाप्यात १३ जणांवर गुन्हे, ६.६६ लाखाचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप पोलीस स्टेशनचे कायद्याचा भाग दाखवत मंद्रूप पोलिसांनी जुगार अड्ड्यावर अक्षरशः सर्जिकल स्ट्राईक खरंच मोठी कारवाई केली आहे. अवघ्या २४ तासात दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून १३ जुगारांना रंगेहात पकडण्यात तब्बल ६.६६,९२०/ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. का धडाकेबाज कारवाईमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.




टाकळी येथील कारवाईतील आरोपी दिनांक १७ मार्च सागर दयानंद शिंदे वय वर्ष २५ राहणार टाकळी, रेऑन सिद्ध सिद्धाराम मांग वय २२ राहणार टाकळी, सागर बालाजी मिरची वय २४ राहणार टाकळी, रवी कुमार हनुमंत वणगे वय २६ राहणार टाकळी संतोष महादेव केरूळ वै २२ राहणार टाकळी, शिवानंद लक्ष्मण घोडके वय २७ राणा टाकळी, नितीन दयानंद शिंदे वय २४ राहणार टाकळी, चांद नबीलाल नदाफ वैयक्तिक राहणार टाकळी दिनांक २७ मार्च रोजी टाकळी येथे शिवानंद घोडके यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडसमोर उघड्यावर बसून, मन्नाजुगार खेळणाऱ्या टोळीवर मंद्रूप पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक कदम सह फौजदार बापू शिंदे पोलीस ना. सचिन मसलखांब

पो.को. संदीप काळे, गणेश गायकवाड बिरु पुजारी, या पथकाने अचूक माहिती या आधारे धाड टाकलेल्या कारवाईमध्ये वरील आठ आरोपींना रंगीहात पकडण्याला आले असून त्यांच्या ताब्यातून ५१,१२००/ किमतीच्या मोटरसायकली मोबाईल रोख रक्कम जुगार साहित्य जप्त करण्यात आले त्यामुळे आता यापुढे देखील अशीच कारवाई सुरू राहणार असे मंद्रूप चे नूतन पोलीस निरीक्षक शंकर पटवारी यांनी सांगितले.

# सोलापूर जनता सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत परिवार पॅनलची बाजी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर जनता सहकारी बँकेच्या संचालक पदाच्या पंचवार्षिक निवडणुकीत सत्ताधारी परिवार पॅनलच्या सर्व १७ उमेदवारांनी बाजी मारली. एकूण १७ पैकी सात उमेदवार यापूर्वीच बिनविरोध निवडून आले असून शुक्रवारी नुमवि प्रशालेत झालेल्या मतमोजणीतून परिवार पॅनलचे उर्वरित १० उमेदवार देखील मोठ्या मताधिक्याने निवडून आले.

या पंचवार्षिक निवडणुकीत एकूण ५१ हजार ४९४ मतदारांपैकी ५ हजार ६७९ मतदारांनी म्हणजेच ११.०२ टक्के मतदारांनी मतदान केले. यातील ५ हजार ४८८ मते वैध तर १९१ मते अवैध ठरली.

या निवडणुकीसाठीच्या चार मतदारसंघांपैकी सोलापूर महानगरपालिका क्षेत्रापासून २५ किलोमीटरच्या बाहेरील मतदारसंघातून डॉ. हर्षद डंबळ, ॲड. मिलिंद कुलकर्णी अमित

### ७ उमेदवार बिनविरोध तर १० उमेदवारांचा मोठ्या मताधिक्याने विजय

आपटे आणि चरणसिंग चौव्हाण, महिला मतदारसंघातून चंद्रिका चौहान आणि गौरी आमडेकर तर अनुसूचित जाती जमाती मतदार संघातून रवींद्र साळे हे बिनविरोध निवडून आले आहेत.

शुक्रवारी झालेल्या मतमोजणीतून विजयी जाहीर करण्यात आलेले उमेदवार आणि त्यांना मिळालेली मते पुढीलप्रमाणे. पुरुषोत्तम उडता (५ हजार २६३), आनंद करवंदे (५ हजार २५३), सुरेश चिक्कळी (५ हजार १७५), महादेव न्हावकर (५ हजार १३२), राजेश पवार (५ हजार २६९), सुनील पेंडसे (५ हजार २५४), सी. ए. गिरीष बोरगावकर (५ हजार २४६), प्रमोद भुतडा (५ हजार २५६), विष्णू मोंढे (५ हजार १२०), ॲड. मल्लिनाथ शहाबादे (५ हजार ३२)

सोलापूर जनता सहकारी बँकेची २०२५-२६ ते २०३०-३१ साठीची संचालकपदाची पंचवार्षिक निवडणूक जिल्हाधिकारी आणि मुख्य निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या देखरेखी खाली झाली. जिल्हा उपनिबंधक आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड आणि सहकारी अधिकारी वर्गाने ही निवडणूक प्रक्रिया राबवली. यात त्यांना सोलापूर जनता सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, सहाय्यक निबंधक आबासाहेब गावडे, उमेश पवार, गजानन वाडेकर, राजेंद्र ढोणे यांची मोलाची मदत झाली.

# प्रभाग क्रमांक १७ मधील विद्यमान नगरसेविका माधुरी ताई धोत्रे यांनी मनसेच्या वतीने मुस्लिम बांधवांना ही भेटवस्तू वाटप करून सर्व धर्म समभावाचा संदेश दिला



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : प्रभाग क्रमांक १७ मधून नगरसेविका माधुरीताई धोत्रे यांनी आपल्या वार्डातील मनसेच्या वतीने मुस्लिम बांधवांना ही भेटवस्तू वाटप करून दिला सर्व धर्म समभावाचा संदेश. मुस्लिम धर्मियांचा पवित्र मानल्या जाणाऱ्या रमजान ईद निमित्त पंढरपूर येथील प्रभाग सत्रामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप धोत्रे यांच्या पुढाकारातून मुस्लिम समाज बांधवांना भेटवस्तू देण्यात आल्या.

प्रसंगी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अनिल सावंत, पंढरपूर नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष प्रणिताताई भालके, प्रभागाच्या कार्यक्षम नगरसेविका माधुरीताई धोत्रे, संभाजी ब्रिगेडचे नेते किरण राज घाडगे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष अभिराज उबाळे, नगरसेवक संजय बंदपट्टे, नगरसेवक लोकेश यादव, नगरसेवक देवमारे विठ्ठल बंद पट्टे शकील शेख लालासाहेब शेख मजीद बागवान जमीर सय्यद गणेश पिंपळनेर यांच्यासह मोठ्या संख्येने मुस्लिम बंधू-भगिनी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना मनसे नेते दिलीप धोत्रे म्हणाले की सर्व सर्व धर्म समभाव हे दृष्टिकोन आणि सर्वसामान्य नागरिकांचे हित डोळ्यासमोर ठेवून काम करण्याची कर्तव्य पार पाडत आहे. पुढील काळात नागरिकांचे प्रश्न सोडवून प्रभागाचा चेहरा मोरा बदलून रोल मॉडेल करणार असल्याचा विश्वास धोत्रे यांनी उपस्थित नागरिकांना दिला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी धोत्रे यांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा.

गेल्या अनेक दिवसापासून मनसेनेते दिलीप धोत्रे यांच्या संकल्पनेतून प्रभाग क्रमांक १७ मध्ये सर्व धर्मियांचे सण, उत्साह महापुरुषांच्या जयंती निमित्त सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे,त्याचबरोबर प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी थेट शासन दरबारी प्रयत्न करत विकास निधी खेचून आणण्याचे काम धोत्रे यांच्या माध्यमातून होत असल्याचे लवकरच प्रभागाचा चेहरा मोरा बदलून एक रोल मॉडेल म्हणून प्रभागाची ओळख निर्माण होईल असाही विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# डॉ. देविदास शिंदे व डॉ. मीनल शिंदे यांना कुसुमाग्रज शिक्षक सन्मान पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्हा मराठी अध्यापक संघाच्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय कुसुमाग्रज शिक्षक सन्मान पुरस्कार मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिन्नर येथील उपक्रमशील, विद्यार्थीप्रिय, प्रा.डॉ. देविदास नामदेव शिंदे (मराठी विभाग)व




डॉ. मीनल शिंदे यांना नुकताच प्रदान करण्यात आला आहे.

सदर पुरस्कार सोहळा कविवर्य कुसुमाग्रज नगरी अर्थात शिरवाडे वणी येथे नेत्ररोगतज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने, खासदार भास्करराव भगरे, मविप्र सरचिटणीस नितीन ठाकरे, आमदार किशोर दराडे, जिल्हा मराठी अध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश सलादे, उपाध्यक्ष किरण पवार, सहचिटणीस सतीश सोनवणे यांसह मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्ताने शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तीस सदर पुरस्कार देण्यात येतो. ज्ञानदानाबरोबरच, मराठी भाषा सक्षमीकरण, संवर्धन व समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देत असून भरीव शैक्षणिक उपक्रमशीलतेची दखल घेऊन सदर पुरस्कार डॉ.देविदास शिंदे व डॉ. मीनल शिंदे यांना दिला आहे.ह्या पुरस्काराबद्दल समाजातील विविध स्तरांतील मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# कौठाळी येथील मच्छीमारांना जाळी अनुदान वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथील १४ मच्छीमारांना जाळी अनुदान वाटप मत्स्य व्यवसाय सहाय्यक आयुक्त राजेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ लिपिक विनोद वाघमोडे होते.

मच्छीमारांनी शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेऊन उद्योजक बनावे असे आवाहन मत्स्य सहाय्यक आयुक्त राजेश पाटील यांनी केले. यावेळी मा.उपसरपंच रामदास



नागटिळक यांनी कौठाळी येथील मच्छीमारांना व्यवसाय करण्यासाठी मोफत होडी देण्याची मागणी केली. या कार्यक्रमाच्या वेळी हरी सलमपुरे, दादासो नगरे,सोमनाथ सलमपुरे, चंद्रकांत नगरे, रूपाली नगरे, राजू नगरे, राहुल सलमपुरे नितीन नगरे, चंदुलाल भोई, माणिक नगरे, दत्तात्रय नगरे, कृष्णा सोलमपुरे, नंदकुमार सलमपुरे, सुनील सलमपुरे यांच्यासह तारापूर, कान्हापुरी येथील मत्स्य व्यवसायकांना जाळी अनुदान वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास सरपंच महादेव गाढवे, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष शिवाजी नागटिळक, सतीश भोई, नंदकुमार भोई यांच्यासह बहुसंख्या मत्स्यव्यवसायिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास नागटिळक यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार हरी सलमपुरे यांनी मानले.

# पंढरपुरात बौद्ध विहाराच्या जागेसाठी बुद्धभूमी निर्माण कृती समितीचे आमरण उपोषण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर जवळील यमाई तलावाजवळ असणाऱ्या पंढरपूर नगरपालिकेच्या बुद्ध विहार उभारण्याची बुद्ध भूमी निर्माण कुटी समितीची मागणी आहे. गेली १४ वर्षांपासून सर्व सामाजिक संघटनेच्या मागण्यानुसार नगरपरिषदेकडून ठराव करून समितीच्या कडून पाठपुरावा करून ही देखील प्रशासनाची संसद भूमिका असल्याने महाड मुक्ती दिनाच्या चवदार तळ्याचे ९९ वर्धापन दिनाचे औचित्य साधून बौद्ध विहाराच्या संस्थेच्या जागेत तात्काळ मिळावी या मागणीसाठी शुक्रवार दिनांक २० मार्च २०२६ रोजी, पंढरपूर तहसील कार्यालयासमोर बौद्ध विहारच्या कृती समितीच्या वतीने कार्याध्यक्ष सिद्धार्थ जाधव, कार्याध्यक्ष दीपक चंदनशिवे, गायकवाड, उपाध्यक्ष योगेश जाधव, जनसंपर्क अमित कसबे, यांनी आमरण उपोषण आंदोलन सुरू केले आहे. नगरपरिषदेने लोकशाही मार्गाने केलेल्या प्रस्ताव तयार करून त्वरित मंजुरी मिळावी अन्यथा आमरण आंदोलन उपोषण सुरूच राहणार असा इशारा कुपोषणकर्त्याकडून देण्यात आला आहे.

यावेळी सुनील सर्व गोड, आप्पासाहेब जाधव, बाळासाहेब कसबे, जितेंद्र बनसोडे, संतोष सर्व गोड, प्रशांत लोंढे, रवींद्र शेवडे, अमोल फडतरे, एडवोकेट गौतम भालेराव, अर्जुन माने, दीपक साठे, राहुल सर्व गोड, समाधान लोखंडे इत्यादी उपस्थित होते.

**उत्तरप्रदेशातील राही पर्यटन आवास गृह श्रावस्ती येथे विशेष चर्चासत्रा**

**बी.बी. मेश्राम यांचे प्रतिपादन**

# आदर्श महापुरुषांचा खरा संदेश संदर्भासहित प्रचारित आणि प्रसारित केला पाहिजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रावस्ती/प्रतिनिधी : दि ऑल इंडिया नाग संघाच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त खरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मला शिकल्या सवरलेल्या लोकांनी धोका दिला आहे, असे म्हटले होते काय?- भ्रम की वास्तव. या विषयावर १५ मार्च २०२६ ला उत्तर प्रदेशातील राही पर्यटन आवास गृह, श्रावस्ती येथे विशेष चर्चासत्र संपन्न झाले.

द ऑल इंडिया नाग संघाचे राष्ट्रीय संघटक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १८ मार्च १९५६ ला आग्र्याच्या रामलीला मैदानावर संपन्न झालेल्या सभेत मला शिकल्या सवरलेल्या लोकांनी धोका दिला आहे? असे म्हटल्याचे जाहीरपणे सांगितले जाते. मात्र महाराष्ट्र सरकारने प्रकाशित केलेल्या सदरील भाषणात याचा कुठेही उल्लेख आढळत नाही. उलटपक्षी जो संदेश दिलेला आहे, त्याचा मात्र प्रचार प्रसार होताना दिसत नाही. जाणीवपूर्वक असा चुकीचा प्रचार प्रसार करणारे जेवढे दोषी आहेत, तेवढेच त्यांच्या या कृतीचा समर्थन करणारे सुद्धा दोषी आहेत. आपणाला जे काय म्हणायचे असेल, ते आपण संदर्भातसहीत स्पष्ट केले पाहिजे. सदरील भाषणात १८ मार्च १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ते मागील पंचवीस वर्षापासून राजकारणात का होते? हे स्पष्ट करताना अस्पृश्यांच्या घराघरात ज्ञानगंगा पोहोचली पाहिजे, अस्पृश्यांना शासकीय नोकऱ्यात व्यापक प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, तसेच खेड्यापाड्यात राहणाऱ्या तरुण अस्पृश्यांच्या जीवनात सुधारणा झाली पाहिजे. जेणेकरून ते भाकरी पेक्षा स्वाभिमानाला महत्त्व देऊ शकतील. अशाप्रकारे आदर्श महापुरुषांचा खरा संदेश समाज जीवनात संदर्भासहित प्रचारित आणि प्रसारित होण्याची नितांत आवश्यकता आहे. करिता सक्षम मानवीय संसाधने निर्माण व्हावीत म्हणून ऐकणाऱ्या श्रोत्यांना सुद्धा व्यक्त होण्याची संधी दिली जात आहे. जेणेकरून आजचे श्रोते हे उद्याचे नेते होऊ शकतील. याची पूर्तता व्हावी म्हणून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाऊंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ कटिबद्ध आहे. त्यामुळे सदरील विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.







यावेळी मार्गदर्शन करताना नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाचे वकील व मानवी अधिकार पुरस्कार प्राप्त कार्यकर्ते ॲड. शैलेंद्र आंबेडकर म्हणाले की, समाजातील शिकली सवरलेली माणसे ही दुधातील सायी प्रमाणे असतात. त्यांनी समाजाला पुढे नेण्यासाठी आपल्या संसाधनाचा उपयोग केला पाहिजे. आपल्या समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात जागतिक स्तरावर लढा दिला पाहिजे.

राष्ट्रीय प्रशिक्षण सचिव उपेंद्र साफी म्हणाले की, केवळ एखादी समस्या जाणून घेऊन चालणार नाही तर तिच्या निर्मूलनासाठी कृती कार्यक्रम राबवले पाहिजेत. आपण बुद्धाचे अनुयायी असल्याने मार्गदात्याची भूमिका पार पाडली पाहिजे. तसेच बाबासाहेबांचे संदेशानुसार भाकरी पेक्षा स्वाभिमानाला महत्त्व दिले पाहिजे.

आंजनेय कनौजीय्या म्हणाले की, कुणी आपल्या महालात बोलावलं तरी आपण आपले झोपडे सोडून तिथे जाऊ नये. आपणास आदर्श महापुरुषांच्या विचारांच्या प्रचारासाठी घरोघरी गेले पाहिजे. चळवळीच्या कार्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्ते उपलब्ध व्हावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काही जणांना परदेशात उच्च शिक्षणासाठी पाठविले होते, मात्र शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी आपले कर्तव्य पार पाडले नाही. शासकीय नोकरदाराकडून फार अपेक्षा होत्या मात्र ते त्या प्रमाणात जबाबदारी पार पाडताना दिसत नाहीत.

या सत्राचे सूत्रसंचालन राष्ट्रीय परिषद सदस्य इंजिनिअर चंद्रेश्वर राम तर प्रास्ताविक मीडिया सचिव अर्जुन राम यांनी व्यक्त केले. अशाप्रकारे हर्षोल्हासात चर्चासत्र संपन्न झाले.